# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**विषय :— सन २०१८—२०१९ या शैक्षणिक वर्षातील सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्तीबाबत....**

सोबत, शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे यांच्याकडून उपरोक्त शिष्यवृत्ती अनुषंगाने प्राप्त झालेले परिपत्रक जोडलेले आहे.

सदर परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे सन २०१८—२०१९ या शैक्षणिक वर्षातील सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती करीता नवीन मंजूरी तसेच प्रथम, द्वितीय, तृतीय नूतनीकरण (Online Renewal) करीता विद्यार्थ्यांनी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावरून ऑनलाईन पध्दतीने दि.३१/१०/२०१८ पूर्वी अर्ज भरणे आवश्यक आहे. व शिष्यवृत्तीचे नूतनीकरण (Offline Renewal) अर्ज करणा—या विद्यार्थ्यांनी www.dhepune.gov.in या संकेतस्थळावरून सदर अर्ज डाऊनलोड करावा व परिपूर्णरित्या भरून आवश्यक त्या कागदपत्रांसह कार्यालयाकडे दि.२०/१०/२०१८ पर्यंत जमा करावा. सदर अर्ज भरणा करताना आधार कार्ड असणे आवश्यक आहे. तथापि एखादया विद्यार्थ्याकडे आधार कार्ड नसेल तर त्याऐवजी त्या विद्यार्थ्याने आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत किंवा पॅन कार्ड, अथवा ड्रायव्हींग लायसन्ससची प्रत अथवा प्राचार्यांची सही व शिक्का असलेले विद्यार्थ्यांच्या ओळखीबाबतचे फोटोंसह असलेले प्रमाणपत्र ईत्यादी यापैकी एका कागदपत्राची छायांकित प्रत जोडावी. सदर अर्ज भरल्यानंतर त्याची हार्ड कॉपी पदव्युत्तर प्रवेश विभागाकडे आवश्यक त्या कागदपत्रांसह विहीत मुदतीपूर्वी पाठवून देण्यात यावीत.

तेंव्हा याप्रकरणी झालेल्या आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, जे विद्यार्थी आपल्या अधिविभागातील ज्या विद्यार्थ्यांना उपरोक्त शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरणा करावयाचे आहेत अशा विद्यार्थ्यांकडून दि. १५ ऑक्टोबर, २०१८ पूर्वी अर्ज भरून घेवून पुढील कार्यवाहीसाठी सदर अर्ज पदव्युत्तर प्रवेश विभागात अभिप्रायासह पाठवून देण्याबाबत व सदरचे परिपत्रक विद्यार्थ्यांच्या निदर्शनास येईल असे विभागाच्या नोटीसबोर्डवर लावण्याबाबत संबधितांना सूचना देण्यात याव्यात.

कुलसचिव

पदव्युत्तर प्रवेश विभाग/१००53
दि. ३१/०८/२०१८

10 SEP 2018

D:\pathak\dbackup\P.G.Admission\Nitin Yadav\Submission and Circullar.docx